॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/आर्थिकदुर्बल/ **०६** /२०२५ दि. ०३/०१/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
कबचौउमविशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना ..

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करणेबाबत..**

महोदय/ महोदया,

विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी उच्च शिक्षणापासुन वंचित राहू नये त्याची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आर्थिक हालाखीमुळे थांबू नये. अशा विद्यार्थ्यांना यथायोग्य अर्थसहाय्य करणेबाबत विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना कार्यान्वीत असून पत्रकातील निकषाप्रमाणे योजना समितीच्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु महोदयांच्या निर्देशान्वये आर्थिक सहाय्य दिले जात असते.

प्रस्तुत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपणास विनंती करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आपल्या पदवी/ पदव्युत्तर वर्गात नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकडून पत्रकात नमूद मुदतीत अर्ज स्वीकारावीत आणि सदरचे अर्ज आपल्या समितीव्दारे तपासावेत. तपासणी करतांना अनाथ/ अंत्योदय कार्डधारक/ दारिद्रय रेषा कार्डधारक (BPL) / स्वयंम दिव्यांग (अपंग) /शेतकरी कुटुंबातील आत्महत्याग्रस्त यांचे मुलगा-मुलगी/ आई-वडील मयत/ मागासवर्गीय अशा विद्यार्थ्यांना निवड करतांना प्राधान्य देण्यात यावे. अर्जदार व आई/वडील/ पालक यांचे सर्व मार्गाने मिळून सन २०२३-२४ चे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/- पेक्षा जास्तीचे नसावे.

तसेच विद्यार्थी विकास मंडळाच्या **दि. ०३/०१/२०२३ रोजी संपन्न झालेल्या सभेत ठराव क्र. विविमंस क्र. ४/२०२३** अन्वये **घशैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून १) शासनाची शिष्यवृत्ती मिळत असेल अश्या विद्यार्थ्यांना आर्थिक दुर्बल घटक योजनेचा लाभ देण्यात येवू नये. २) शासनाकडून १००% फि माफी मिळत असेल अश्या विद्यार्थ्यांना आर्थिक दुर्बल घटक योजनेच्या लाभ देण्यात येवू नये. ३) विद्यार्थी मागील वर्षाच्या परीक्षेत सर्व विषय पास असला पाहिजे. अशाच विद्यार्थ्यास आर्थिक दुर्बल घटक योजनेच्या लाभ देण्यात यावा. ४) विद्यापीठाच्या दुस-या कोणत्याही योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थास या योजनेत लाभ देण्यात येवू नये असे निकष लावावेत असे सर्वानुमते ठरले आहे.** त्यानुसार विद्यार्थ्यांची या योजनेसाठी निवड करावी.

**विद्यार्थ्याचा प्रवेश व्यवस्थापन कोटा किंवा उद्योग प्रोत्साहन कोटा (सीट) किंवा स्वायत्त (Autonomus) अभ्यासक्रम यामध्ये झाला असेलतर अशा प्रवेशित विद्यार्थ्यांची या योजनेच्या लाभासाठी शिफारस करु नये.**

**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्थांनी** योजनेकरीता या परिपत्रकासोबत जोडलेला अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावयाचा आहे व प्राप्त झालेल्या अर्जांची वरील नमुद केल्याप्रमाणे छाननी करुन आपल्याकडे प्रवेशित **एकूण विद्यार्थी संख्या ६०० पेक्षा कमी असल्यास कमाल ३ %** किंवा **६०० पेक्षा जास्त असल्यास २ % इतक्याच विद्यार्थ्यांची निवड करुन त्या विद्यार्थ्यांची माहिती विद्यार्थी विकास विभागाच्या ई- पोर्टल वर भरावी.**

१) विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख **:- दि. १५ जानेवारी, २०२५**

२) महाविद्यालय यांनी ई- पोर्टलवर महिती भरावयाची अंतीम तारीख **:- दि. १८ जानेवारी, २०२५**

**विद्यार्थी विकास विभागाच्या ई- पोर्टलवर माहिती भरण्यासाठी दि. १५ ते १८ जानेवारी, २०२५ कालावधीत लिंक सुरु राहील.**

या पत्रकासोबत जोडलेल्या अर्जच विद्यार्थ्यांकडून भरुन विहीत मुदतीत स्वीकारावा. सदरचे अर्ज शैक्षणिक वर्षाकरीता आपल्याकडे सुरक्षित ठेवावेत.

कृपया सदरची सूचना ही सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून आर्थिक दुर्बल घटक अर्थसहाय्य योजना यशस्वी करण्यास आपण व आपल्या सहकारी वृदांनी सहकार्य करावे. सदर योजनेचे पत्रक व विहीत नमुन्यातील अर्ज विद्यापीठाच्या वेबसाईटवर **(http://www.nmu.ac.in)** ला भेट दिल्यास किंवा विद्यार्थी विकास विभागाच्या ई- पोर्टलवर उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

3-1-25

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

सोबत :- अर्जाचा नमुना.

**प्रत -**

१) मा. वित्त व लेखाधिकारी कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४) विभागप्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/Arthik Durbal Yojana 2023-24

फोटो

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्याबाबतचा विहीत अर्ज - (वर्ष २०२४-२५)

## विभाग - अ : वैयक्तीक माहिती :-

१. नांव :- ..........

२. महाविद्यालयाचे /विभागाचे नाव :- ..........

३. शिकत असलेला वर्ग/अभ्यासक्रम :- ..........
(अनुदानीत/ स्वयंनिर्वाह तसेच व्यवस्थापन कोटा/ उद्योग प्रोत्साहन कोटा (सीट))

४. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ..........
(पिन कोड क्र.सह) :- ..........

५. दूरध्वनी क्रमांक (१) :- ..........
एस.टी.डी. कोडसह (२) :- ..........

६. ई-मेल :- ..........

७. लिंग :- पुरुष ☐ स्त्री ☐

८. जन्म दिनांक :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
दिनांक महिना वर्ष

९. शारीरिक किंवा sensory दिव्यांग(अपंग) आहात काय?:- ☐ होय ☐ नाही
असल्यास नमूद करावे ..........

१०. प्रवर्ग व जात :- खुला/ अनुसचित जाती/ जमाती/भटके विमुक्त जाती जमाती
:- विशेष मागासवर्गीय/ इतर मागासवर्गीय/अल्पसंख्याक/ इतर...............

११. अंत्योदय/ दारिद्र्य रेषा कार्डधारक (BPL)..........

१२. बॅंकेचे नाव व पत्ता :- ..........

खाते क्रमांक :- आय.एफ.एस.सी. क्रमांक :-

## विभाग-ब : शैक्षणिक व इतर माहिती :

१. मागील वर्षी पास झालेली परीक्षा :- ..........

२. मागील वर्षी वार्षिक परीक्षेत मिळालेले गुण व टक्के:- ..........
(SGPA/CGPA/Grade/%)

४. एन.सी.सी., एन.एस.एस., कमवा व शिका योजनेत सहभाग घेतला आहे काय? :- होय /नाही
असल्यास कोणत्या उपक्रमात :- ..........

५. क्रीडा/सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला आहे काय? :- होय / नाही

कोणता प्रकार :- ..........

६. मागील वर्षी विद्यापीठाकडून आर्थिक मदत मिळाली होती का? :- ..........
मिळालेली असल्यास किती रुपये :- ..........

**विभाग- क : कौटुंबीक व उत्पन्न माहिती :-**

१. वडीलाचे नाव व पूर्ण :- ..........
पत्ता (पिन कोड क्र.सह) :- ..........
दुरध्वनी क्रमांक :- ..........

२. वडीलाचे शिक्षण :- ..........

३. वडीलाचे व्यवसाय :- ..........

४. वडीलाचे वार्षिक उत्पन्न :- ..........

५. आईचे नाव, पत्ता व व्यवसाय :- ..........

६. आईचे शिक्षण :- ..........

७. आईचा व्यवसाय :- ..........

८. आईचे वार्षिक उत्पन्न :- ..........

९. पालक/ घरातील अन्य व्यक्ति / ..........
भाऊ/ बहिण नाव व पत्ता :-

१०. पालक/घरातील अन्य व्यक्तिंचा व्यवसाय :- ..........

११. पालक/ घरातील अन्य व्यक्तिंचे वार्षिक उत्पन्न :- ..........

मी नमूद करतो / करते की, वर दिलेली सर्व माहिती योग्य असुन मला केंद्र/ राज्य शासनाकडून कोणतीही शिष्यवृती मिळालेली नाही. पुष्टीकरिता आवश्यक दस्ताऐवजांचा छायांकित प्रति अर्जा सोबत जोडत आहे. सदर माहिती / दस्तऐवजामध्ये चुक आढळल्यास मला मिळालेले अर्थसहाय्य विद्यापीठास सत्वर परत करेल अशी हमी देतो / देते. या बाबत विद्यापीठा मार्फत कोणताही निर्णय झाल्यास तो माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

..........

(विद्यार्थी/विद्यार्थिनीची स्वाक्षरी )

---

.................................................मी व माझ्या मुलगा/ मुलगी/ पाल्य याने/ हीने प्रस्तुत अर्जातील माहिती व उत्पन्न विषयक नमुद निवेदन संपूर्णपणे बरोबर असून, जर सदर माहिती अंशतः/ पूर्णतः चुकीची /असत्य/ विपर्यस्त असल्याचे सिध्द झाल्यास त्या बाबत मी व्यक्तिश जबाबदार राहीन व माझ्या मुलास/ मुलीस/ पाल्यास सदर योजने अंतर्गत मंजूर/प्राप्त आर्थिक साहाय्याची रक्कम विद्यापीठास परत करण्याची हमी देत आहे या बाबत विद्यापीठाने कोणताही निर्णय घेतल्यास तो माझ्यावर अंतिमतः बंधनकारक राहील .

...........................

(आई/ वडील/ पालक यांचे नाव व स्वाक्षरी )

दिनांक :-

ठिकाण :-

..............................................................................................................................

## कार्यालयीन उपयोगासाठी

प्रमाणित करण्यात येते की , ................................................ यास/हीस...................................
.............................येथे शैक्षणिक वर्ष- २०२४-२५ साठी.........................वर्ग विद्याशाखेत नियमीत विद्यार्थी म्हणुन रितसर प्रवेश देण्यात आलेला आहे .

दि.

विद्यार्थी विकास अधिकारी
यांची सही व शिक्का

प्राचार्य/ संचालक
यांची सही व शिक्का

**अर्जासोबत जोडावयाची (छायांकीत) कागदपत्रे -**

१) मागील वर्षी पास झालेल्या परीक्षेचे गुणपत्रक.
२) वडील /आई/ पालक यांचा नायब तहसिलदार/ तहसिलदार यांनी दिलेला सन २०२३-२४ चा उत्पन्न दाखला
३) अर्जदार अनाथ असल्यास तसे प्राधिकृत अधिका-याने दिलेले अनाथ प्रमाणपत्र.
४) अर्जदार स्वतः दिव्यांग (अपंग) असल्यास तसे प्रमाणपत्र
५) अंत्योदय कार्ड/ दारिद्र रेषा कार्ड (BPL) प्रत
६) वडील / आई मृत्यु झाला असल्यास त्यांचा मृत्यू दाखला.
७) जातीचे प्रमाणपत्र.
८) बॅक पासबुक प्रत.